नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/१०/२०२४ (बुधवार) दुपार**

---

## पोस्टे केळवद हद्दीतील मौजा तिडंगी पारधी बेडा येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

आगामी विधानसभा निवडणुक या अनुषंगाने कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. १५/१०/२०२४ रोजी मौजा तिडंगी पारधी बेडा येथे मोहाफुल गावठी दारू काढणारे इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे एकुण ०२ महिला व ०१ पुरुष **आरोपी नामे—सुशिल गांजा राजपूत, वय ३१ वर्ष, रा. पारधी बेडा तिडंगी** हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिग भट्टी काढतांना मिळुन आले. आरोपीचे ताब्यातून एकुण मोहाफुल रसायण सडवा ४४८० लिटर किंमती १५६८००/— रु व मोहाफुल गावठी दारु ९० लिटर किंमती ९०००/—रू. व दारु गाळण्याचे साहीत्य प्लास्टीक ड्रम, जळाऊ लाकुड, रबर पाईप, जर्मन घमिले, स्टील झाकणी किंमती ३७३००/—रू असा एकुण किंमती २०३१००/—रू चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. ०२ महिला व ०१ पुरुष आरोपी विरुद्ध पो.स्टे केळवद येथे कलम ६५ (सी), (बी) (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनि किशोर शेरकी, जिवन राजगुरू, पोउपनि बट्टुलाल पांडे, सफौ विनोद काळे, पोहवा राजू रेवतकर, नारायण राठोड, प्रमोद भोयर, विष्णू जायभाय, हेमंत रंगारी, संजय बांते, रविंद्र चामट, मपोहवा नितु रामटेके, पोअं. रोहीत आडे, धोंडुतात्या देवकते यांनी केली आहे.

# रस्त्यावरील मोकाट जनावरांचे मालकावर नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन बुट्टीबोरी परिसर लगत आशियातील सर्वात मोठी महाराष्ट्र औद्योगीक विकास मंडळ असुन सदर एमआयडीसी कंपनीत काम करणारे बरेच वर्कर हे पोलीस स्टेशन बुटटीबोरी व एमआयडीसी बोरी परिसरात राहतात व तिथुन एमआयडीसी कंपनीत ड्युटीवर जाणेयेणे करतात. तसेच बुटटीबोरी एमआयडीसी रोडवर महत्वाचे कॉलेज, शाळा व दवाखाना असल्याने सपुर्ण वाहतुक ही बुटटीबोरी चौक व बुटटीबोरी ते एमआयडीसी रोडवर आहे. सदर एमआयडीसी चौकात व एमआयडीसी रोडवर जनावरे गायी, ढोर हे बसुन राहतात त्यामुळे वाहतुकीची कोंडी होवुन जिवित हानी होण्याची दाट शक्यता असल्याने सदर जनावरांमुळे जिवित हानी होवु नये या दृष्टीकोणातुन मा. सहायक पोलीस अधिक्षक, तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. दीपक अग्रवाल (ण्च्ै) यांच्या मार्गदर्शनखाली पोलीस स्टेशन बुटटीबोरी व एमआयडीसी परिसरात दिनांक ०१.१०.२०२४ ते १५.१०.२०२४ पर्यंत विशेष मोहीम राबवुन पोलीस स्टेशन बुटटीबोरी व एमआयडीसी बोरी येथील पोलीस स्टॉफ व नगर परिषद बुटटीबोरी येथील स्टॉफ यांच्यासोबत सयुक्त मोहीम राबवुन एमआयडीसी चौकात व एमआयडसी रोडवर बसलेल्या जनावरांनावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १००, १०६, ११७ अन्वये २६ कार्यवाही करून सदर जनावरे पकडुन कांझी हाउस मध्ये टाकुन कार्यवाही करण्यात आले आहे.

सदर कारवाही मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर ग्रामीण व मा. अपर पोलीस अधिक्षक साहेब नागपुर ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.दिपक अग्रवाल (I.P.S) यांच्या मार्गदर्शनाखाली पोस्टे बोरी येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. प्रतापराव भोसले, पोस्टे एमआयडीसी बोरी येथील ठाणेदार पोनि सतिशसिंग राजपूत व पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर